Impact Factor-8.632 (SJIF) ISSN 2278-9308

(CDLXVI) 471
Volume-B

# B.Aadhar


Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Sonpeth Dist. Parbhani

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March 2024

## Cooperative Sector in India: Opportunities and Challenges




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
**Director**
Aadhar Social Research & Development
Training Institute, Amravati.

B.Aadhar

**This Journal is indexed in :**
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal

Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLXVI) 471 -B

ISSN : 2278-9308 March 2024

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Sonpeth Dist. Parbhani

# INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Co-Opertaive Movement In India<br>**Mr. Kolekar G.K. , Prof. Dr. S.M. Kolhe** | 1 |
| 2 | The Co-Operative Banking Sector developments In India And Challenges<br>**Dr.Narayan Vinod Kadubal** | 4 |
| 3 | Human Resource Development: Challenges before Cooperative Dairy Business Management in Maharashtra<br>**Dr. Sambhaji V. Mane** | 8 |
| 4 | Performance of PMFBY in Mrathwada Region<br>**Asst. Prof. Dr. Vishnukant Shelke** | 13 |
| 5 | Performance of Deogiri Nagari Sahakari Bank Ltd. Chhatrapati Sambhajinagar<br>**Dr. Rajendra . L. Kable** | 17 |
| 6 | Co-Operative Collection Development Of A Library<br>**Dr. Sarkale Anant B.** | 22 |
| 7 | A study of benefits and challenges faced by Co-operative Banks in India<br>**Dr. Laxmikant Nandkishor Soni** | 27 |
| 8 | Women empowerment through Co-operative institutions<br>**Arti Atmaram Waghmare , Dr. Pradeep D. Shelke** | 31 |
| 9 | Urban Cooperative Banks: Helping Hand for Small Economic Activities<br>**Dr.Baswaraj B. Lakshete** | 34 |
| 10 | Opportunities and Challenges before Cooperative Banks in India<br>**Rindakwale Ajay Balaji ,Dr. N. H. Awade** | 39 |
| 11 | Role of Co-operation in Rural Development **Dr. Pradeep D. Shelke** | 43 |
| 12 | A Study of the Financial Performance and Problemsof Selected Non-Scheduled Urban Co-Operative Banks with Special Preference To Pune District<br>**Vaibhav Suryawanshi** | 46 |
| 13 | Role of Cooperation in Economic Development in India<br>**Mr. Narendra Ramakant Chole , Dr. P. D Shelke** | 54 |
| 14 | भारतातील सहकारी बँकिंगक्षेत्राची रचना **डॉ. मारुती बाबुराव कातकडे** | 58 |
| 15 | प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था:कार्य, समस्या आणि उपाय<br>**प्रोफेसर डॉ. मारोती कच्छवे** | 62 |
| 16 | महाराष्ट्रातील दुग्धव्यवसाय : प्रगती, समस्या व उपाययोजना.<br>**डॉ. प्रोफेसर काळे बी. एम.** | 69 |
| 17 | महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात सहकार क्षेत्राची भूमिका **प्रा. डॉ. टी, एम. गुरुनुले** | 73 |
| 18 | भारतातील सहकारी आंदोलनाचा इतिहास **डॉ.मोहन मिसाळ** | 76 |
| 19 | कृषीधान्य साठवणुकीच्या सहकारी गोदामासमोरील संधी आणि आव्हाने<br>**डॉ.डी.बी. कोनाळे , राहुल व्यंकटराव** | 79 |
| 20 | सहकारी कायदे व नियम **डॉ.सदानंद राजाराम वडजे** | 83 |

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.632, Issue NO, (CDLXVI) 471 -B

ISSN : 2278-9308
March 2024

# महाराष्ट्रातील दुग्धव्यवसाय : प्रगती, समस्या व उपाययोजना.

डॉ. प्रोफेसर काळे बी. एम.

मराठी विभाग प्रमुख, कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि.परभणी

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

भारत देश कृषी प्रधान असून शेतीला जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसायाला महत्त्वाचे स्थान आहे. भारत किंवा महाराष्ट्रातील दुग्ध व्यवसाय अत्यंत पुरातन स्वरूपाचा आहे. पूर्वी दुग्ध उत्पादक आपल्या जवळील दूध शहरी भागात नेऊन विकत असत. परंतु हा व्यवसाय असंघटित क्षेत्रात होत होता.त्यामुळे दूध उत्पादकांचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत होते. भारतात सर्वप्रथम गुजरातमध्ये खेडा जिल्ह्यात 1946 साली सहकारी तत्त्वावर दुग्ध संस्था स्थापन करण्यात आली.याच जिल्ह्यातील ४०० गावात प्राथमिक दुग्ध सहकारी संस्थांची स्थापना झाली.या सहकारी संस्था दूध संकलन करून ते जिल्हा दुग्ध संघाकडे पाठविण्यात येत असे. जिल्हा स्तरावर आनंद येथे खेडा मिल्क युनियनची स्थापना करण्यात आली. त्यालाच बऱ्याचदा आनंद डेअरी असेही संबोधले जाते.

महाराष्ट्रात मुंबई येथे 1951 साली आरे येथे सरकारमार्फत दुग्ध व्यवसाय सुरू करण्यात आला. मात्र 1964 साली हा व्यवसाय सहकार क्षेत्राकडे देण्यात आला व सरकारने त्याला भरीव स्वरूपाची मदत केली. 1951 साली पुण्यामध्येही सहकारी तत्त्वावर सहकारी दुग्ध संस्थांची स्थापना झाली. व हा प्रयत्न अत्यंत यशस्वी ठरला म्हणून महाराष्ट्र सरकारने 1958 साली दुग्ध व्यवसाय विभागाची स्थापना केली दरम्यान 1960 व 62 मध्ये मिरज,कोल्हापूर, अहमदनगर,धुळे,नागपूर औरंगाबाद इत्यादी ठिकाणी शासकीय दुग्ध योजना सुरू करण्यात आला. 1961 साली युनिसेफच्या मदतीने वरळी येथील दुग्ध शाळेचा प्रकल्प पूर्ण करण्यात आला. या डेरी मार्फत ग्रामीण भागातून संकलित केलेल्या दुधावर शास्त्रीय पद्धतीने प्रक्रिया करून ते दूध अनेक शहरांना आरे या नावाने पाठवले जाते.

1964 नंतर महाराष्ट्रात सहकारी क्षेत्रात दुग्ध व्यवसायाकडे विशेष लक्ष देण्यात आलेले आहे. महाराष्ट्रात सहकारी दुग्ध व्यवसायाची रचना त्रिस्तरीय स्वरूपाची आहे.ग्रामीण स्तरावर प्राथमिक सहकारी दूध उत्पादन संस्था स्थापन करण्यात आलेले आहेत. तालुका किंवा जिल्हास्तरावर जिल्हा पातळीवरील दूध संघ स्थापन करण्यात आलेले आहेत. व राज्यस्तरावर शिखर संस्था म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाची स्थापना करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्रात गाव किंवा खेडे पातळीवर प्राथमिक दूध सहकारी संस्था स्थापन झालेले आहेत. या संस्था सकाळ,संध्याकाळ अशा दोन वेळा दुधाचे संकलन करून दूध तालुका किंवा जिल्हा संघाकडे पाठवितात. काही ठिकाणी दूध संकलन केल्यावर तिथेच त्यावर प्रक्रिया केल्या जातात व दुधाचे वितरण करतात. विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात अशा प्रकारच्या संस्था मोठ्या प्रमाणावर आहेत.त्या खालोखाल मराठवाड्यात व सर्वात कमी विदर्भात आहेत. 1961 साली महाराष्ट्रात प्राथमिक दूध संकलन संस्था फक्त 431 होत्या व २००७ पर्यंत त्या ३०९१३ पर्यंत वाढलेल्या आहेत. ही वाढ 71 पटीने झालेले आहे. याचाच अर्थ शेतीला जोडधंदा म्हणून दूध संकलन व्यवसायाने महत्त्वाचे स्थान प्राप्त केलेले आहे.सुरुवातीला संस्थेची सभासद संख्या 15500 होती ती 2007 पर्यंत 21 लाख 18 हजार 343 पर्यंत वाढलेली आहे.ही वाढ 136 पट आहे म्हणजेच सभासदांच्या संख्येत सहकारी संस्थेच्या संख्येच्या तुलनेत चांगलीच वाढ झालेली आहे.या संस्था शासनाच्या भांडवलावर अवलंबून न राहता त्यांनी मोठ्या प्रमाणावर स्वनिधी जमवलेला आहे ती बाब स्वनिधीच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. या संस्थाची दूध संकलन 1961 साली 69 लाख रुपयाचे होते ते दोन हजार सात अखेर एक लाख 28 हजार 260 लाख रुपयाचे झाले आहे.म्हणजेच दूध संकलनात मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे.

**दुग्ध व्यवसायाच्या समस्याः-**

महाराष्ट्रात दुग्ध व्यवसाय समाधानकारकरीत्या प्रगती करीत असला तरी त्यामध्ये अनेक दोष आहेत.हे दोष आपल्याला पुढील प्रमाणे सांगता येतील.

1) **दूध संकलनाची समस्याः-**

एकाच गावात दोन संस्था असल्यामुळे दूध संकलनात या संस्थांना अनेक प्रश्न येतात. तसेच कधी कधी विशेष हंगामात मोठ्या प्रमाणावर दुधाचे संकलन होते व जिल्हा किंवा तालुका संघ दूध घेण्याचे नाकारतात. त्यामुळे या संस्था दोन्ही बाजूने अडचणीत येताना दिसतात.

ISSN : 2278-9308
March 2024

2) दूध वाहतुकीच्या समस्या:-

[illegible] मुख्य रस्त्यापासून दूर व दुर्गम नागासलेल्या भागातील दूध सहकारी संस्था स्थापन झालेले आहेत.या संस्था [illegible] दुधाचे संकलन करतात परंतु खराब रस्ते व अपुऱ्या वाहतूक साधनांमुळे ते दूध जिल्हा किंवा तालुका [illegible] वेळेवर पोहोचत नाही.त्यामुळे या संस्थांना तोटा सहन करावा लागतो.

3) दूध साठविण्याची समस्या:-

दूध साठविण्याला शीतकरण केंद्राची गरज असते.अशी केंद्रीय तालुका स्तरावर आहेत.खेड्यात शेतकऱ्यांच्या सोयी उपलब्ध नसल्यामुळे दुधाचा साठा करणे शक्य होत नाही. त्यामुळे सभासदांनी जास्त दूध केंद्रावर आणले तर ते घेतले जात नाही.

4)दुधातील भेसळ:-

दुधाला मोठ्या शहरातून मोठ्या प्रमाणावर मागणी असते. त्यामुळे अनेकदा सभासद दुधात काही पदार्थाची भेसळ करून ते चांगले आहे असे दर्शवितात. कधी कधी प्राथमिक दूध संघ सुद्धा व निर्भेळ दुधाचा पुरवठा केला जात नाही.

5)अपुरे भाग भांडवल:-

प्राथमिक दूध संकलन केंद्राचे भांडवल अत्यंत अपुरे आहे.त्यामुळे त्यांना आधुनिक स्वरूपांची यंत्रसामग्री खरेदी करता येत नाही किंवा सभासदांना जनावरे खरेदी करण्यासाठी किंवा त्यांच्या पशुखाद्यासाठी पुरेसे आर्थिक सहाय्य करता येत नाही.

6)दुधातील घट:-

सभासदाचे दूध खरेदी करताना केंद्रातील कर्मचारी साधारणपणे शंभर ग्रॅम दूध नमुना म्हणून घेतात व तपासणीनंतर दूध केंद्राच्या कॅनमध्ये ते दूध टाकतात. त्यामुळे सभासदाच्या दुधात दररोज ही कायमस्वरूपी घट होत असते.याशिवाय दुधाची हाताळणी, साठवणूक, वाहतूक इत्यादी मध्ये ही दूध सांडले जाते

7)आरोग्यास हानिकारक:-

दुधाची तपासणी करताना अनेकदा त्याला विशिष्ट डिग्री लागावी म्हणून त्यात युरिया सारखे रासायनिक खते मिसळले जाते. तसेच जनावरांना प्रदीर्घकाळ कीटकनाशकांचा अंश असलेला चारा किंवा वैरण दिल्यामुळे काही अंशी प्रमाण दुधात येते त्यामुळे हे दूध मनुष्याच्या आरोग्यास हानिकारक ठरते.

8)अपुऱ्या पशुवैद्यकीय सेवा:-

शेतकऱ्यांना जनावरासाठी पशुखाद्याची गरज असते.पण वारणा व कोल्हापूर सारख्या संघांनीच पशुखाद्याचे कारखाने सुरू केलेले आहेत इतर संघ बाजारातून पशुखाद्य खरेदी करून ते सभासदांना पुरवितात.याशिवाय जनावरांना पशुवैद्यकीय सेवेची वारंवार गरज असते पण प्राथमिक दूध केंद्र ही सवलत पुरवीत नाहीत.

9)दुधाच्या किमतीत तफावत:-

प्राथमिक दूध सहकारी संस्था शेतकऱ्यांकडून अत्यंत कमी दरात दुधाची खरेदी करतात व शहरी ग्राहकांना मात्र त्याच दुधासाठी खूप जास्त किंमत आकारले जाते उदाहरणार्थ शेतकऱ्यांना गाईच्या एक लिटर दुधाला 40 मिळतात तर शहरी ग्राहकांना तेच दूध 60 रुपये लिटर प्रमाणे घ्यावे लागते.त्यामुळे धड शेतकऱ्यांचा फायदा होत नाही किंवा ग्राहकांनाही फायदा मिळत नाही.

10)पशू प्रजननाचे पारंपारिक तंत्र:-

महाराष्ट्रात अद्यापही संकरित जनावराचा दुधासाठी उपयोग अत्यंत कमी प्रमाणावर होत आहे.अजूनही पारंपारिक व जुन्या जनावरांचा दुधासाठी वापर केला जातो.त्यांची दूध देण्याची क्षमता अत्यंत कमी असते संकरिकरण व कृत्रिम रेतनाचे कार्यक्रम याचा प्रसार झालेला दिसून येत नाही.

11)असमतोल विकास:-

प्राथमिक दूध सहकारी संस्थांचा महाराष्ट्रात सर्वत्र सारखा विकास झालेला नाही उदाहरणार्थ पश्चिम महाराष्ट्रात उदाहरणात सातारा, कोल्हापूर ,सोलापूर, पुणे अहमदनगर ,नाशिक इत्यादी जिल्ह्यांमध्ये या संस्था मोठ्या प्रमाणावर आहेत. मराठवाड्यात त्यांचा विशेष विकास झालेला व विदर्भात नागपूर व अमरावती वगळता इतर जिल्ह्यात या संस्थांचा जेमतेम स्वरूपाचा विकास झालेला आहे.

- उपाय योजना:-

दुग्ध व्यवसायाच्या विकासासाठी खालील उपाययोजना करणे आवश्यक वाटते.

1) अर्थक्षम संस्थांसाठी प्रयत्न-

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

प्राथमिक दूध सहकारी संस्था मधील स्पर्धा नष्ट करण्यासाठी अनेकदा राजकीय स्वार्थामुळे एकाच गावात गरजेपेक्षा अधिक संस्थांना परवानगी दिली जाते. त्यावर उपाय म्हणून एका गावात एकच संस्था दिली पाहिजे. संस्थांनी आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायावर उभ्या राहण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

२) पायाभूत सुविधा पुरविणे-

दूध नाशिवंत पदार्थ आहे.दूध जास्त दिवस साठवण्यासाठी त्यावर प्रक्रिया करावी लागते.तसेच ते शीतगृहात ठेवावे लागते. म्हणूनच राज्य सरकारने या संस्थांना पायाभूत स्वरूपांच्या सोयी उपलब्ध करून देणे आवश्यक वाटते.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

३)स्वस्त दराने कर्जपुरवठा-

प्राथमिक दूध सहकारी संस्था द्वारे फक्त शेतकरी सभासदांना कर्ज पुरवठा केला जातो.भूमिहीन शेतमजुरांना कर्ज पुरवठा केला जात नाही. दूध संस्थांच्या सभासदांना संकरित गाई, म्हशी पशुखाद्य इत्यादींची खरेदी करावी लागते म्हणून त्यांना स्वस्त दराने कर्जपुरवठा राष्ट्रीयकृत बँका व सहकारी बँकांनी केला पाहिजे.

४) दूध संकलन क्षमता वाढविणे-

महाराष्ट्रात दुधाच्या महापूर योजनेमुळे दुधाच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. मात्र त्याचे संकलन करण्याची क्षमता प्राथमिक दूध सहकारी संस्था व तालुका संघाकडे नाही. म्हणून त्यांच्या क्षमतेत वाढ करण्याची सरकारने परवानगी देणे आवश्यक आहे.

५)खर्चावर नियंत्रण-

या संस्थांना दुधाचे संकलन,त्याची वाहतूक त्यावर प्रक्रिया करणे,दूध साठविणे इत्यादीसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च करावे लागतात. कधी कधी क्षमतेपेक्षा कमी दूध प्राप्त होते परंतु प्रक्रिया यंत्रणेवरील खर्चात कपात केली जात नाही.म्हणून संस्थेने ज्या ज्या ठिकाणी शक्य असेल त्या त्या ठिकाणी खर्चावर नियंत्रण ठेवल्या पाहिजे.

६)पशु वैद्यकीय सेवा पुरविणे-

महाराष्ट्रात फारच थोडे संघ शेतकऱ्यांना पशुखाद्याचा पुरवठा करतात इतर संघांना ते शक्य झालेले नाही.तरी किमान तालुकास्तरावरील संघांनी सभासदांना पशुखाद्य सवलतीच्या किमतीत उपलब्ध करून दिले पाहिजे तसेच स्वस्त दरात पशुवैद्यकीय सेवांचा पुरवठा केला पाहिजे

७) दूध प्रक्रिया क्षमतेत वाढ करणे-

दूध नाशवंत असल्यामुळे त्यावर त्वरित प्रक्रिया करणे आवश्यक असते परंतु महाराष्ट्रात दुधावर प्रक्रिया करणारे प्लांट खूपच कमी आहेत. त्यांची क्षमता अत्यंत कमी आहे म्हणून सरकारने अशा प्रक्रिया केंद्राची संख्या वाढवून त्यांची क्षमता वाढविणे आवश्यक आहे.

८)तंत्रज्ञानात बदल-

दुधावर प्रक्रिया करण्यासाठी विशिष्ट प्रकारचे तंत्रज्ञान वापरावे लागते. परंतु अजूनही अनेक दूध संघ जुन्याच प्रक्रिया पद्धतीचा वापर करतात. तसेच या संस्थांना खाजगी क्षेत्राशी स्पर्धा करावी लागते.म्हणूनच त्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे.

९) प्रादेशिक असमतोल दूर करणे-

दूध व्यवसायाचा विकास मोठ्या प्रमाणावर पश्चिम महाराष्ट्रात झालेला आहे. त्यामानाने विदर्भ व मराठवाड्यात कमी विकास झालेला आहे. गेल्या काही वर्षात विदर्भात अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. विदर्भात शेतीला पूरक म्हणून या व्यवसायाचा विकास करण्यात आल्यास शेतकऱ्यांना उत्पन्नाची साधन प्राप्त होईल त्यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी होईल व प्रादेशिक असंतुलही भरून काढला जाईल.

१०) व्यवसाय प्रशिक्षण प्रशिक्षण-

सहकारी दूध संस्थांनी शेतकऱ्यांना जनावरे पाळणे पैदास करणे दूध उत्पादन व संकलन इत्यादीच्या संदर्भात वेळोवेळी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन केले पाहिजे त्यामुळे दुधाचे उत्पादन वाढवून खर्चातही बचत करता येईल.

११)भेसळीवर नियंत्रण-

प्राथमिक दूध सहकारी संस्थांनी नागरी भागातील लोकांना शुद्ध व निर्भेळ दुधाचा पुरवठा करणे आवश्यक आहे.त्यांची स्वतःची नीतिमत्ता जोपासून सभासदांना दुधात भेसळ करण्यापासून प्रावृत केले पाहिजे व प्राथमिक संस्थांनी स्वतःही दुधात कोणती भेसळ करू नये.

**१२)शासकीय बंधने दूर करणे-**

सरकार अनेकदा दूध उत्पादन व संकलन यावर बंधने घालते. या बंधनांचा सभासद व दूध संस्थांवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे सरकारने या व्यवसायावर जाचक बंधने न घालता दूध उत्पादन दूध संकलन व दुधाचे निर्यात इत्यादीसाठी प्रोत्साहन दिले पाहिजे.

**१३) विकासासाठी प्रोत्साहन-**

सहकारी क्षेत्रात दूध व्यवसायाला चांगले भवितव्य आहे ही बाब लक्षात घेऊन या व्यवसायाच्या विकासासाठी राज्य सरकारने प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. राज्यस्तरावरील शिखर संघ व अखिल भारतीय दूध फेडरेशन यांनी तालुका संघ, प्राथमिक संस्था व सभासद यांना या क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञानाची वेळोवेळी माहिती दिली पाहिजे. *थोडक्यात*; दूध व्यवसायाचा नियोजनबद्ध पद्धतीने विकास करण्यासाठी अनुकूल वातावरणाची निर्मिती करणे आवश्यक आहे. असे असले तरी आज इतर कोणत्याही उद्योगाच्या तुलनेत दूध व्यवसायाची प्रगती अत्यंत समाधानकारक आहे.

**संदर्भग्रंथसूची:-**

१)भारतातील बँक व्यवसाय आणि सहकार: डॉ. पी व्ही कदम
२)भारतीय बँक प्रणाली : डॉ.सुधीर बोधनकर
३)बँकिंग अँड फायनान्स : जोशी, डांगे

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani